कंत्राटी शेतीखाली प्रायोजकांची लायसन्स फी
शासकीय तिजोरीमध्ये भरण्याकरिता नविन
लेखाशिर्ष उपलब्ध करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांक मंकृप २००८/प्र.क्र.१२७/२१-स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : जून, २००९.

संदर्भ : १. पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक जाक्र/पणन-५/थेट पणन/ लायसन्स फी/बजेट हेड/२८१७/२००८, दिनांक २६/९/२००८.

प्रस्तावना :

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्याखालील महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विनियमन) नियम १९६७ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या सुधारीत नियमानुसार थेट पणन / खाजगी बाजार, शेतकरी ग्राहक बाजार यासाठी अनुज्ञप्ती घेताना संबंधितांना महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) नियम, १९६७ नुसार लायसन्स फी (अनुज्ञप्ती शुल्क) भरावी लागते. सदर 'लायसन्स फी' भरणा करण्याकरिता नविन लेखाशिर्ष देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ५ (ई) अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) नियम १९६७ मधील नियम ४ (ओ) अंतर्गत कंत्राटी शेती पुरस्कर्त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे स्वतःची नोंदणी करतेवेळी शासकीय तिजोरीमध्ये चलनाव्दारे 'लायसन्स फी' (अनुज्ञप्ती शुल्क) भरणा करण्याकरिता पुढीलप्रमाणे लेखाशिर्ष उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

मुख्यलेखाशिर्ष-०४२५-सहकार,
८००-इतर जमा रकमा,
(०१)(२१) कंत्राटी शेती प्रायोजकांची फी (०४२५-०२४-१)

सदरआदेश वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्र. अनौ. १३/०९/अर्थ-१३, दि. १४/१/२००९ व लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक तांत्रिक/संगणक-२००९/कक्ष-५/अनौ. संदर्भ क्र. १२१/२००९, दि. ०३/०२/२००९ च्या संदर्भानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा क्रमांक २००९०६१५१३२४२४००१ हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(श्रीकांत चं. आंडगे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रति,

१. महालेखापाल, लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखापाल, लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, नागपूर
३. निवासी लेखापरिक्षण अधिकारी, मुंबई
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था
८. संचालक, लेखा व कोषागारे, संगणक शाखा, मुंबई
९. वित्त विभाग (व्यय-२/अर्थसंकल्प-१३)
१०. कक्ष अधिकारी (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. अवर सचिव (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. निवड नस्ती (२१-स)